## प्रेसनोट

दि. ०४/०७/२०२४

लोकसेवक प्रविण वसंत अहिरे, तत्कालीन शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे (वर्ग-१) व त्यांची पत्नी यांचेविरुद्ध ज्ञात उत्पनापेक्षा जास्त मालमत्ता बाळगले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर गु.र.नं. १७८/२०२४. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम १३(१)(इ), १३(२), सह भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, (सुधारीत अधिनियम सन २०१८) चे कलम १३(१)(ब), १३ (२) सह भा.दं.वि. कलम १०९. |
| तक्रारदार / फिर्यादी | श्री. रुपेश जाधव, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. पुणे. |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) प्रविण वसंत अहिरे, वय ४६ वर्ष, तत्कालिन शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे (सध्या - माध्यमिक शिक्षण अधिकारी, नंदुरबार) (वर्ग-१)<br>२) सौ. स्मिता प्रविण अहिरे, वय ४१ वर्ष, व्यवसाय – नोकरी. (पत्नी) दोघे रा. आनंदनगर, पाथर्डी फाटा, नाशिक. |
| परिक्षण कालावधी | दि. १८/०३/२००२ ते दि. १०/०२/२०२० |
| अपसंपदा निष्पन्न रक्कम | ३१,७८,२००/- रुपये (ज्ञात उत्पन्नापेक्षा २५.२६% जास्त) |

गुन्हा दाखल दिनांक :- ०४/०७/२०२४ रोजी.

थोडक्यात माहिती :- यातील आरोपी लोकसेवक प्रविण अहिरे यांनी संपादित केलेल्या मालमत्तेबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे कार्यालयाकडून उघड चौकशी करण्यात आली होती. लोकसेवक प्रविण अहिरे यांनी संपादित केलेल्या मालमत्ता कायदेशीर स्त्रोताद्वारे संपादित केली किंवा कसे ? याबाबत त्यांना वेळोवळी संधी देवून माहिती घेण्यात आली होती. त्यांनी लोकसेवक पद धारण केलेल्या कालावधीत त्यांना प्राप्त असलेल्या कायदेशीर उत्पन्नापेक्षा जास्त किमतीची मालमत्ता स्वतःचे तसेच पत्नी सौ. स्मिता अहिरे यांचे नावे रक्कम रुपये ३१,७८,२००/- (ज्ञात उत्पन्नापेक्षा २५.२६ % जास्त) किमतीची अपसंपदा भ्रष्ट मार्गाने संपादित केल्याचे उघड चौकशीअंती निष्पन्न झाले आहे.

सदरहु विसंगत बेहिशोबी मालमत्ता संपादित करण्यासाठी लोकसेवक श्री. प्रविण वसंत अहिरे यांना त्यांची पत्नी सौ. स्मिता वसंत अहिरे यांनी सहाय्य करुन गुन्ह्यास प्रोत्साहित करुन, अपप्रेरणा दिली. म्हणुन लोकसेवक प्रविण अहिरे (सध्या - माध्यमिक शिक्षण अधिकारी, नंदुरबार) व त्यांची पत्नी सौ. स्मिता अहिरे यांचेविरुध्द बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे वरीलप्रमाणे उघड चौकशीअंती अपसंपदेचा गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे.

सदर गुन्ह्याचा पुढील तपास श्री. प्रविण निंबाळकर, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. पुणे करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

कोणताही लोकसेवक, शासकीय अधिकारी / कर्मचारी यांनी अपसंपदा संपादित केल्याबाबत खात्रीलायक माहिती असल्यास तसेच लोकसेवक, शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

Scanned with CamScanner